# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक ३ रा रविवार दि.२९ जून २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## फडणवीसांच प्रमोशन झाल्यास अजितदादा मुख्यमंत्री व्हावेत; राष्ट्रवादीच्या 'या' नेत्याची पांडुरंगाला प्रार्थना

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षातील अनेक नेत्यांकडून ते मुख्यमंत्री होण्याबाबची विधाने केली जात आहे. काही नेत्यांनी तर देवाला साकडे देखील घातल्याचे त्या नेत्यांनीच सांगितले आहे. याबाबत आमदार अमोल मिटकरी यांनी पांडुरंगाला साकडे देखील घातले असल्याचे त्यांनी सांगितले होते. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी देखील आम्हालाही वाटतं अजितदादांनी मुख्यमंत्री व्हावं, अशी इच्छा बोलून दाखविली होती. अशातच आता राष्ट्रवादीच्या एका आमदाराने अजित पवार मुख्यमंत्री होण्याबाबतचे वक्तव्य केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नांदेड जिल्ह्यातील लोहा कंधारचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी तशाच प्रकारचे वक्तव्य करत देवेंद्र फडणवीस यांचं प्रमोशन झाल्यास अजित पवार मुख्यमंत्री व्हावेत, अशी इच्छा बोलून दाखविली आहे. देवेंद्र फडणवीस यांचं प्रमोशन झाल्यास अजितदादाच मुख्यमंत्री व्हावेत यासाठी पांडुरंगाकडे प्रार्थना केली असल्याचे देखील प्रताप पाटील चिखलीकर यावेळी बोलताना म्हणाले.

नेमकं काय म्हणाले प्रताप पाटील चिखलीकर?

मी पांडुरंगाच्या दर्शन घेण्यासाठी १९ वर्षांपासून वारीत जात असतो. पांडुरंगाच्या चरणी लीन झालो. पांडुरंगाकडे प्रार्थना केली



की राज्यातील शेतकरी, कष्टकरी सुखी समृद्ध व्हावा. नांदेड आणि काही भागावर दुबार पेरणीचं संकट येणार होतं ते टळावं आणि ते टळलं. याबाबत पाडुंरगाकडे प्रार्थना केली आहे.

अमोल मिटकरी म्हणाले की अजित पवार पुढच्या वेळी मुख्यमंत्री म्हणून पुजेला यावेत यावर तुमचं मत काय? या प्रश्नाचे उत्तर देताना देवेंद्र फडणवीस साहेबांना मुख्यमंत्रीपदापेक्षा मोठं पद मिळालं तर निश्चित दादाच मुख्यमंत्री होतील. दादाच मुख्यमंत्री झाले पाहिजेत, अशी प्रार्थना पांडुरंगाकडे केली असल्याचे पाटील चिखलीकरांनी सांगितले.

## एखाद्याला खूश करण्यासाठी मुलांचे भविष्य; हिंदी सक्तीवरून सुप्रिया सुळेंची प्रतिक्रिया

राज्यात पहिलीपासून हिंदी सक्तीच्या निर्णयावरून वातावरण तापले आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी सरकारला हा निर्णय मागे घेण्यास वेळोवेळी सांगितलेही होते. मात्र त्यावर तोडगा निघत नसल्याने आता ठाकरे बंधूंचा हिंदी सक्तीविरोधात एकत्र मोर्चा निघणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील या मोर्चात सहभागी होणार असल्याचे सांगितले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, हा आमच्यासाठी राजकीय मुद्दा नाही, तर एक महत्त्वाचा सामाजिक मुद्दा आहे. भाषा, शिक्षण हा एक असा मुद्दा आहे, जो खूप गांभीर्याने घेतला पाहिजे. आपण तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पुढे जायला पाहिजे. इतर कोणतेही राज्य अशाप्रकारे काम करत नाही. महाराष्ट्र इतका आग्रही पवित्रा का घेत आहे? हे मला समजत नाही. आपण एखाद्याला खूश करण्यासाठी मुलांचे भविष्य खराब करू शकत नाही.



यावेळी सुप्रिया सुळे यांना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या मोर्चात सहभागी होणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. यावर सुप्रिया सुळेंनी आम्ही या मोर्चात पूर्ण ताकदीने सहभागी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. तर दुसरीकडे, जयंत पाटील यांनी देखील हिंदीसक्ती विरोधातील ठाकरेंच्या मोर्चाला शरद पवार गटाचा जाहीर पाठिंबा असल्याचे सांगितले आहे.

'राज्य सरकार महाराष्ट्रात जी हिंदी सक्ती लादू इच्छित आहे त्याविरोधात दिनांक ५ जुलै २०२५ रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. प्रत्येक मराठी माणसाने या मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन मी करत आहे.

कुणाचाही विविध भाषा शिकण्याला किंबहुना हिंदी भाषेलाही विरोध नाही. पण इयत्ता पहिलीपासूनचं प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून व्हावं असा आग्रह आहे. जो योग्य आहे आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्ष म्हणून आमचीही हीच भूमिका आहे.

शैक्षणिक धोरणाच्या त्रिभाषा सूत्राआडून मातृभाषेला डावलण्यासाठी प्रयत्न होत असतील तर मराठी माणूस एकदिलाने त्याचा विरोध करणार. महाराष्ट्र हिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा महाराष्ट्रासाठी आणि जेव्हा राष्ट्रहिताचा प्रश्न उभा राहतो तेव्हा राष्ट्रासाठी पक्षीय भेदाभेद बाजूला सारून उभं राहणं हेच 'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचं स्पष्ट धोरण आहे,' असे सोशल मीडियावर पोस्ट करत जयंत पाटील यांनी सांगितले आहे. ५ जुलैला हिंदी सक्तीविरोधात मोर्चा दरम्यान, येत्या ५ जुलैला हिंदी सक्तीविरोधात शिवसेना उबाठा अध्यक्ष उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे मोर्चा काढणार आहेत. मुंबईतील गिरगाव चौपाटी ते आझाद मैदान असा हा विराट मोर्चा असेल. मोर्चाची वेळ लवकरच जाहीर केली जणार आहे.

## जनतेच्या प्रश्नाची प्राधान्याने सोडवणूक करा अन्यथा सबंधीतांची गय केली जाणार नाही आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते चार कोटीच्या विकास कामाचे सत्तरधरवाडी येथे लोकार्पण आणि शुभारंभ

लातूर : - गेल्या पंधरा-वीस वर्षापासून ग्रामीण मतदार संघात काम केले, संघर्ष केला सर्वसामान्यांनी साथ दिली म्हणूनच प्रस्थापिताची सत्ता उलथून नवा इतिहास घडला. आपल्या आशीर्वादाने आमदार म्हणून काम करण्याची मला संधी मिळाली जनतेचे प्रश्न सोडविणे हे माझे कर्तव्य आहे. ग्रामीण भागातील गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या सार्वजनिक असो की वैयक्तिक प्रश्नाची प्राधान्याने सोडवणूक झाली पाहिजे याबाबतीत कोणी अडवणूक, हायगई अथवा दिरंगाई केली तर सबंधित अधिकाऱ्याची गय करणार नाही असा इशारा लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी दिला.





लातुर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे सत्तरधरवाडी येथे २७ जून २०२५ शुक्रवार रोजी सव्वाचार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा लोकार्पण आणि उद्घाटन सोहळा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम प्रकाश शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, तहसीलदार घनश्याम अडसूळ, पंचायत समितीचे राऊत, भाजपा मंडळ अध्यक्ष उद्धव काळे, सतीश आंबेकर, पद्माकर चिंचोलकर, प्रताप पाटील, शरद दरेकर, राजकीरण साठे, रवींद्र पाटील, बालाजी साळुंखे, सरपंच आडे, उपसरपंच श्रीनाथ बंडगर आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

आ. रमेशआप्पा कराड यांचे गावात आगमन होताच वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत ग्रामस्थांनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले. सत्तरधरवाडी येथील सिमेंट रस्ता, बंदिस्त नाली १० लाख, सभागृह १० लाख, आरो पाणी प्लँट ३ लाख, दलित वस्ती ५ लाख, तांडा वस्ती १० लाख, जनसुविधा पेव्हर ब्लॉक रस्ता ७ लाख, मातोश्री पानंद रस्ता २ कि.मी. ४६ लाख, सेवादास विधुतीकरण ५ लाख, वडार वस्ती सिमेंट रस्ता १० लाख, दलित वस्ती सिमेंट रस्ता ५ लाख, बोअरवेल ३ लाख, शाळा कलर १ लाख या पुर्ण झालेल्या विकास कामांचे लोकार्पण आणि ३ कोटी रुपये खर्चाच्या जलजिवन मिशन टाकी, विहीर आणि पाईप लाईन कामाचे उद्घाटन आणि ३४५ गरजू लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी झालेल्या जाहीर कार्यक्रमात बोलताना आ. रमेशआप्पा म्हणाले की, गेल्या पंधरा-वीस वर्षात काँग्रेसवाल्यांनी अनेक गावात पिण्याचे पाणी देण्याचे कामही केले नाही. कोणती कामे केली, कुठल्या कामाला किती निधी आणला याचे आपण साक्षीदार आहोत. गावागावात लाखोंची नव्हे तर कोठ्यावधीची कामे मंजूर करून आमदार काय करू शकतो हे आपण दाखवून दिले आहे. देशात नरेंद्रजी आणि राज्यात देवेंद्रजी यांच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला ग्रामीण भागाच्या विकासाला न्याय देण्याच काम होत असल्याचे त्यांनी बोलून दाखविले.

भादा सर्कल जरी औसा तालुक्यात असले तरी या भागाचा मी आमदार आहे काँग्रेसवाल्यांनी विकासापासून कोसोदूर ठेवलेल्या या भागाला विकासाच्या वाटेवर आणून पन्नास वर्षात जी विकास कामे होऊ शकली नाहीत ती कामे पाच वर्षात केल्याशिवाय राहणार नाही अशी ग्वाही देऊन ज्या विश्वासाने मला आशीर्वाद दिला, आमदार केले त्या विश्वासाला पात्र राहण्यासाठी आणि गोरगरीब सर्वसामान्य माणसाच्या डोळ्यातील अश्रू पुसण्यासाठी काम करीत आहे असेही आ. कराड यांनी बोलून दाखवले.

. प्रारंभी भादा मंडळ अध्यक्ष उध्व काळे आणि राजकिरण साठे यांनी आपले मनोगत व्यक्त करून विकास कामाची गती कायम ठेवण्यासाठी या पुढील काळातही आप्पासाहेबांना साथ द्यावी असे बोलून दाखविले. सत्तरधरवाडीचे उपसरपंच श्रीनाथ बंडगर यांनी प्रास्ताविकातून आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून गावात झालेल्या कामाची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे स्वागत ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले याप्रसंगी पवन अंधारे, शिवराज पाटील, धनराज कवठे, शिवप्रसाद पाटील, सुनील पवार, भीमराव चव्हाण, वसंत राठोड, विक्रम बंडगर, भगवान राठोड, महेश कांबळे, बालाजी बंडगर, नाना राठोड, उत्तम राठोड, विलास राठोड यांच्यासह महिला पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## भाई किशनराव देशमुख महाविद्यालय चाकुर येथे...

प्रदीर्घ सेवा करून सेवा निवृत्त झाल्याबद्दल

**प्रा.भीमराव साळवे** सरांना पुढील आनंदी जीवनासाठी खुप खुप

मंगलमय शुभेच्छा!









-: शुभेच्छुक :-

**प्रा.वैजनाथ सुरनर**

डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार

महाराष्ट्र शासन


## विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करावे : माजी मंत्री आ.संजय बनसोडे रंगकर्मीने केला उदगीर - तालुक्यातील गुणवंताचा गौरव आई - वडील व गुरुजन हेच आपले ईश्वर






उदगीर : उदगीर हे सांस्कृतिक चळवळीचे केंद्र असुन उदगीर शहरात गेल्या अनेक वर्षापासून रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठाणने अनेक विविधांगी सांस्कृतिक उपक्रम राबवले आहेत. अगदी लहानमुलांपासुन ते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत रंगकर्मी प्रतिष्ठानने त्यांच्या कलेत रंग भरण्याचा प्रयत्न केला आहे. उदगीर ही गुणवंत विद्यार्थ्यांची खाण आहे. त्यामुळे आजचा विद्यार्थी हा उज्ज्वल भवितव्य असलेल्या आपल्या देशाचा उद्याचा जबाबदार नागरीक आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या ध्येयाकडे लक्ष केंद्रित करावे असे आवाहन माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी केले. ते निडेबन येथील लिंकन इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजीत रंगकर्मी साहित्य, कला, क्रीडा प्रतिष्ठाणच्या वतीने आयोजीत गुणवंत विद्यार्थांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी लिंकन स्कुलचे संचालक दिलीपकुमार गायकवाड, प्रसिध्द कवी भारत सातपुते, नायब तहसीलदार संतोष धाराशिवकर, माजी नगरसेवक मनोज पुदाले, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सय्यद जॉनीमियाँ, दत्ता पाटील, प्रणिती होळसंबरे, बाळासाहेब मरलापल्ले, ज्ञानेश्वर बडगे, विवेक होळसंबरे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. बिभीषण मद्देवाड, प्रा. ज्योतीताई मद्देवाड, उपाध्यक्ष सिध्दार्थ सुर्यवंशी, सचिन शिवशेट्टे, हणमंत केंद्रे, सुनिल हावा, अॅड.महेश मळगे, निता मोरे, वर्षा मुस्कावाड, मनोहर लोहारे, संदीप निडवदे, बाबासाहेब मादळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, रंगकर्मी प्रतिष्ठाणच्या वतीने चित्रकला, निबंध स्पर्धा, बॅडमिंटन स्पर्धा व त्याचबरोबर उदगीरच्या मातीत असलेल्या सुप्त गुणांना रूपेरी पड्द्यावर संधी देण्यासाठी आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सव घेतले आहेत. याचा फायदा या भागातील विद्यार्थांना होत आहे. केवळ कला गुणांनाच संधी न देता या प्रतिष्ठानने वृक्षारोपण, रक्तदान, आरोग्य शिबीर, नेत्रतपासणी शिबीर व सामान्य नागरिकांना नेहमीच मदतीचा हात दिलेला आहे. पथनाट्य हे रंगकर्मीचे व्यासपीठ मिळवून देणारे खरे केंद्र असुन त्याचीच पावती म्हणून काही दिवसापुर्वीच राज्यपातळीवरील २०२४ चे 'लोकसंस्कृती साहित्य संमेलन' उत्तम प्रकारे घेण्याचा मान रंगकर्मीने पटकावला असल्याचे ही आ.संजय बनसोडे यांनी सांगितले आहे. यावेळी उदगीर व जळकोटसह सोलापूर, बीड, लातुर येथील गुणवंत विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्ही एस पँथर्स ऑटो युनियन च्या वतीने वाहतूक पोलीस निरीक्षक डी डी सुकाळे साहेब यांचा सत्कार

लातूर: येथील व्ही एस पँथर्स ऑटो युनियन च्या वतीने नूतन वाहतूक पोलीस निरीक्षक मा डी डी सुकाळे साहेब यांचा सत्कार जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संघटनेचे मार्गदर्शक रवि कुरील ,विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे ,जिल्हाउपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड, कामगार आघाडीचे युनूसभाई शेख किशोर नागिमे सह पदाधिकारी उपस्थित होते .



# संपादकीय

## रो-रो सेवा दिवास्वप्नच!

सध्या भाऊचा धक्का ते मांडवा अशी सुरू असलेली रो-रो सेवा सिंधुदुर्गपर्यंत विस्तारणार असल्याची घोषणा राज्य सरकारकडून करण्यात आली होती. ऐन गणपती उत्सवाच्या काळात ही सेवा सुरू होणार असल्याने चाकरमान्यांमध्ये आनंदी आनंद होता; मात्र सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीत रो-रो सेवेसाठी आवश्यक जेटी नसल्याने चाकरमान्यांच्या आनंदावर सध्या तरी विरजण पडले आहे.

कोकण रेल्वेची गणपती उत्सवाचे बुकिंग तीन मिनिटांत हाऊसफुल्ल झाले आणि सार्यांच्या नजरा रो-रो सेवेकडे लागल्या होत्या. रो-रो सेवेमध्ये अडीचशे गाड्यांसह जाता येत असल्याने अनेकांनी नादुरुस्त मुंबई-गोवा महामार्गापेक्षा रो-रो बरी असा विचार करून त्याचे बुकिंग कधी सुरू होणार, याकडे नजरा लावल्या होत्या; पण रो-रो सेवा सुरू होण्याला सध्यातरी ब-ेक लागल्याने आता मुंबई-गोवा महामार्ग कधी सुरू होणार, याकडे सर्वांच्या नजरा आहेत. दरवर्षी कोकणात गणेशोत्सवासाठी २५ ते ३० लाख चाकरमानी गावचा रस्ता धरतात. सध्या रेल्वेची दर दिवशीची क्षमता ही पाच हजार प्रवासी जाण्याची आहे. एकूण गणपतीच्या पहिल्या दहा दिवसांत फार तर दोन ते तीन लाख प्रवासी जाऊ शकतात. त्यामुळे अनेक चाकरमान्यांसमोर रस्ते मार्गाचा प्रवास हाच पर्याय असतो.

मुंबई-गोवा महामार्ग हा १४ वर्षे रखडलेला आहे. नागोठणे ते रत्नागिरीदरम्यान अनेक ठेकेदार बदलले. निधी उपलब्ध नसणे, भूमी संपादनाचा तिढा कायम असणे, अशा या ना त्या कारणांनी या महामार्गाचे काम रखडलेले आहे. त्यामुळे सहा तासांत घरी जा, हा फॉर्म्युला काही यशस्वी झालेला नाही. प्रचंड वाहतूक कोंडी, रस्त्याची दुरवस्था या कारणांमुळे दक्षिण कोकणात या महामार्गावरून पोहोचण्यासाठी १४ तासांपेक्षा जास्त काळ लागत आहे.

सागरी महामार्गाची परिस्थितीही फारशी चांगली नाही. त्यामुळे रो-रो सेवा हा एक उत्तम पर्याय चाकरमान्यांना मिळणार होता; परंतु जेटीचा अडसर याला आड येत आहे. सध्या जयगडला जी जेटी आहे, त्याची डागडुजी झालेली नाही आणि गाड्या उतरवण्यासाठी बंदरात जो रॅम्प लागतो तो दिघी, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, विजयदुर्ग आणि मालवण येथे कुठेही उपलब्ध नाही. त्यामुळे ही रो-रो सेवा सुरू करायची झाली, तर थेट मुंबई ते गोवा अशीच होऊ शकते. हाही पर्याय चाकरमान्यांना चालणारा आहे. कारण, गोवा ते सिंधुदुर्ग अंतर १०० ते १२० कि.मी. आहे. त्यामुळे ५०० कि.मी.च्या खड्डेमय प्रवासापेक्षा १०० कि.मी. गाडीने प्रवास चाकरमान्यांना शक्य आहे; मात्र याबाबतही कोणतीच चाचणी झालेली नसल्याने ऐन गणेश चतुर्थीत हा प्रवास शक्य आहे का, याबाबत प्रश्नचिन्ह आहे. विमानाचा प्रवास हा एक पर्याय असला, तरी चिपी विमानतळ सध्या सुरू झालेले नाही. त्यामुळे गणेशोत्सवात चाकरमान्यांची कोंडी होण्याचा संभव अधिक आहे.

कोकणसाठी ग्रीन फिल्ड महामार्ग, सागरी महामार्ग, चिपी विमान प्रवास असे अनेक पर्याय सांगितले गेले असले, तरी एकही परिपूर्ण पर्याय उपलब्ध नाही. गोव्याचा रो-रो सेवेचा पर्याय जो विचाराधीन आहे, तेथेही मेरिटाईम बोर्डाच्या जेटीचे प्रस्तावाचे काम पूर्ण झालेले नाही. पणजीला जी फेरीबोटीची जेटी उपलब्ध आहे, त्यावर रो -रो कितपत उभी राहू शकते, हे चाचणीनंतरच समजू शकते. त्यामुळे रो-रोची बोट उपलब्ध असली, तरी जेटी नसल्याने 'चणे आहेत पण दात नाहीत' अशी अवस्था या रो-रो सेवेची आहे. कोकणच्या विकासाच्या गप्पा करत असताना त्यादृष्टीने निश्चित असे पाऊल टाकले जात असल्याचे सध्या तरी दिसत नाही. कोकणात अनेक समस्या आहेत, ज्यांचे निराकरण होण्याची गरज आहे. त्यातील एक म्हणजे, वाहतूक व्यवस्था होय. रो-रो सेवेकडे सरकारने गांभीर्याने बघावे, हीच अपेक्षा आहे.

# जर तुम्ही संवेदनशील नसाल तर तुमच्या शिक्षणाचा काय उपयोग:

शिक्षण समजुतीला जन्म देते.जर तुमच्याकडे समज असेल तर तुम्ही समाजासाठी एक चांगले व्यक्ती असल्याचे सिद्ध करता.दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर,जर तुमचे शिक्षण समाजाच्या उन्नतीसाठी उपयुक्त नसेल,तर तुम्ही कितीही पदव्या मिळवल्या तरी तुम्ही शिक्षित नाही!

पण जर तुमच्या आजूबाजूला किंवा तुमच्या देशात,एका डोळ्यातही पाणी(अश्रु) असेल,कोणताही तरुण वाया गेला असेल, कोणत्याही मुलीवर बलात्कार झाला असेल,कोणत्याही मुलावर अत्याचार झाला असेल आणि तुम्हाला या गोष्टींचा त्रास होत नसेल,तर तुम्ही शिक्षणाच्या नावाखाली वेळ वाया घालवत आहात!

जर तुमच्या आजूबाजूला किंवा तुमच्या देशात एखाद्याचे शोषण होत असेल,कोणी उपचाराशिवाय मरत असेल, एखादी स्त्री स्वातंत्र्यासाठी आसुसलेली असेल,कोणी असहाय्यतेने आपले शरीर विकत असेल आणि या गोष्टी माहित असूनही तुम्ही या समस्या सोडवण्यासाठी काहीही करू शकत नसाल,तर समजून घ्या की तुम्ही शाळेत जाऊन मोठी चूक केली आहे!

जर तुमच्या आजूबाजूला किंवा तुमच्या देशात कुठेतरी द्वेष किंवा उन्माद असेल, कुठेतरी दंगल किंवा हिंसाचार असेल,कुठेतरी बांगड्या विखुरल्या असतील,कुठेतरी वस्त्या उद्ध्वस्त झाल्या असतील,पण तुम्ही म्हणता की ते जाऊ द्या,मला काय फरक पड़त आहे? म्हणून समजून घ्या की तुम्ही घेतलेल्या शिक्षणात एक गंभीर त्रुटी आहे!

तुमच्या आजूबाजूला किंवा तुमच्या देशात द्वेषाची लागवड केली जात आहे आणि जर तुम्हाला वाटत असेल की या लागवडीतून निर्माण होणारे विष तुमच्या भावी पिढ्यांसाठी चांगले आहे,तर तुमचे शिक्षण विषासारखे आहे!

निष्पाप मुले तुमच्या आजूबाजूच्या रस्त्यांवर किंवा तुमच्या देशात भटक्या प्राण्यांपेक्षाही वाईट परिस्थितीत फिरत आहेत. तुम्ही हे त्या मुलांचे नशीब मानता आणि क्षणभरही विचार करत नाही की या मुलांच्या या दुर्दशेला कोण जबाबदार आहे? तर समजून घ्या की तुमचे शिक्षण निरर्थक आहे!

भूक,गरिबी आणि अन्याय यावर तुमचे मौन हे सिद्ध करते की पदवीधारक असूनही तुम्ही शिक्षणापासून वंचित आहात.

जर तुम्हाला राजकारणाचे डावपेच समजले नाहीत आणि माध्यमांनी तयार केलेल्या कथा खऱ्या मानल्या नाहीत, तर तुमचे शिक्षण अजूनही अपूर्ण आहे.जर तुम्ही धर्माच्या नावाखाली दंगलखोर जमावाचा भाग झालात,किंवा खोट्या बातम्यांच्या आधारे एखाद्याला शत्रू आणि एखाद्याला नायक मानले तर तुम्ही शिक्षणापासून अजूनही मैल दूर आहात.

जर तुम्ही धर्माच्या जुन्या श्रद्धेवर विश्वास ठेवत असाल आणि धर्माच्या कुजलेल्या श्रद्धांना शंकापलीकडे मानत असाल,तर समजून घ्या की तुम्ही शिक्षणाच्या नावाखाली कचरा गोळा केला आहे.

जर तुम्हाला तुमच्या निराशेच्या सीमेतून कोणत्याही प्रकारची हिंसाचार दिसला आणि या घटनांना विरोध करण्याऐवजी,स्वतःला शांततेच्या चादरीत लपवून ठेवा आणि प्रत्येक वेळी स्वतःला अदृश्य करा,तर समजून घ्या की तुमचे शिक्षण पूर्णपणे निरुपयोगी ठरले आहे.

जर तुम्ही रंग,जात, प्रदेश,भाषा,संपत्ती किंवा लिंगाच्या आधारावर स्वतःला श्रेष्ठ किंवा कनिष्ठ समजत असाल,तर समजून घ्या की तुमचे शिक्षण समाजासाठी एक शाप आहे!

पदव्यांच्या ढिगाऱ्यावर बसून स्वतःला शिक्षित समजण्याची चूक करू नका! मला वाटते की जर तुमच्या पदव्यांच्या वजनाने तुमच्या अंतर्गत भावना मारल्या असतील,तर तुम्ही अजूनही माणूस बनण्याच्या प्रक्रियेपासून खूप दूर उभे आहात!

*******

जय इन्सान जय संविधान जय भारत

# वीज दर स्वस्त नसुन शॉक आहे.

राज्यातील वीज ग्राहकांसाठी वीज दर ठरविण्यासाठी महावितरणने दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र नियामक आयोगाने निर्णय दिला असून घरगुती-औद्योगिक अशा सर्व ग्राहकांच्या वीजदरात आगामी पाचही वर्षात कपात करण्याचा आदेश दिला आहे.स्मार्ट मीटर असलेल्या घरगुती ग्राहकांना दिवसा वीज वापरासाठी १० टक्के अतिरिक्त टीओडी सवलत आणि सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रोत्साहन याचे स्वागतच.गरीब व सर्वसामान्य ग्राहक घरगुती युनिटचा वापर साधारणतः १०० ते ३०० युनिट पर्यंत होतोच आणि सरकारने ग्राहकांना फक्त १ ते १०० युनिट पर्यंत ५.७४ प्रति युनिट असा दिलासा दिला आहे हे तर असे झाले की उंट के मु मे जीरा त्यामुळे वीज ग्राहकांना दिलासा किंवा स्वस्त म्हणता येणार नसुन याला जोर का झटका म्हणावा लागेल. आज राज्यात १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे ७० टक्के सांगितले जात आहे.परंतु माझ्या माहितीनुसार १०० युनिटपेक्षा कमी वीज वापरणाऱ्यांचे प्रमाण साधारणतः ३० टक्के पेक्षा कमी असावेत आणि शंभरच्या वर म्हणजे १०० ते ३०० युनिट पर्यंत वापरणाऱ्यांचे प्रमाण ५० टक्के पेक्षा जास्त असावेत कारण यात गरीब व सर्वसाधारण किंवा कामगार वर्ग मोडतो. त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने वीजेचे जे युनिट दर आणि युनिटची आकडेवारी दिली आहे त्यात बदल करणे गरजेचे आहे.विद्युत नियामक आयोगाने जे १ ते १०० पर्यंत युनिटचे दर ५.७४ लावले आहेत ते दर १ ते ३०० युनिट पर्यंत लावायला पाहिजे होते तेव्हा ग्राहकांना दिलासा मिळेल. कारण साधारणतः १०० युनिटच्या वर सर्वांचाच वापर होतो. करीता वीज दरात ग्राहकांना सरसकट दिलासा हा दिखावा असुन महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेला मोठा शॉक आहे.महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मितीच्या बाबतीत अव्वल आहे.परंतु इतर राज्यांच्या बरोबरीचा विचार केला तर वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रांतील दर जास्त व महागडे आहे ही वीज निर्मिती करणाऱ्या राज्याच्या दृष्टीकोनातून चिंताजनक बाब म्हणावी लागेल.त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने आखुण दिलेले वीज दर सर्वसामान्यांना परवडणारे नसल्याने यात बदल करून १ ते ३०० पर्यंत युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांना ५.७४ प्रति युनिट दर लावावा जेणेकरून याचा फायदा गरीब व सर्वसामान्यांना सहज होईल.कारण वाढती महागाई, वीजेचे बिल,घर टॅक्स,पाणी बील,औषधोपचाराचा खर्च इत्यादी अनेक बाबी अल्पशा उत्पन्नात पुर्ण होवू शकत नाही त्यामुळे आपली स्वतःची वीज निर्मिती असल्याने यात गरीब व सर्वसामान्यांना कशा पद्धतीने लाभ देता येईल यावर सरकारने,महावितरणने व महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने गांभीर्याने विचार करावा व ग्राहकांना दिलासा द्यावा हीच अपेक्षा.

************

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## माधुरी दीक्षितचा नवरा गुडघे आणि सांधेदुखीसाठी सांगतोय जबरदस्त उपाय; नक्की ट्राय करा आणि आराम मिळवा

चुकीचा आहार, व्यायामाची अयोग्य पद्धत आणि एकूणच चुकीची जीवनशैली या सगळ्या गोष्टींचा परिणाम आपल्या शरीरावर होत असतो. त्यामुळे कामावरून आल्यावर पाठ, लॅपटॉपची बॅग घेतल्यावर खांदे दुखणे तर खूप दिवसांनी चालल्यावर गुडघे दुखणे आदी अनेक समस्या आपल्या सगळ्यांनाच जाणवतात. त्यामुळे गुडघे, पाय, कंबर, छाती, पाठ, खांदे यांच्या स्नायूंच्या मजबुतीकडेसुद्धा आपण लक्ष दिले पाहिजे.

माधुरी दीक्षित यांचे पती डॉक्टर श्रीराम नेने, जे कार्डिओथोरॅसिक सर्जन व पब्लिक हेल्थ ॲडव्होकेट आहेत; जे सोशल मीडियावर युजर्ससाठी उपयुक्त टिप्स शेअर करण्याच्याही प्रयत्नात असतात. अलीकडील एका इन्स्टाग्राम व्हिडीओमध्ये त्यांनी स्नायूंना बळकट करणे, गुडघे आणि सांध्यातील वेदना कमी करणे यांसाठी सोप्या टिप्स शेअर केल्या आहेत.

डॉक्टर श्रीराम नेने यांनी दिलेल्या टिप्स खालीलप्रमाणे हालचाल करा, पण अगदी हुशारीने - मजबूत गुडघ्यांसाठी त्यांची योग्य प्रकारे हालचाल होणे आवश्यक असते. जसे की, सायकलिंग, पोहणे, चालणे. जंप स्क्वॅट्स आणि इंटेन्स रन्स यांसारखे जड, गुडघ्यांना ताण देणारे व्यायाम टाळा. तर याबद्दल राजाजी नगर येथील फोर्टिस हॉस्पिटलमधील ऑर्थोपेडिक्सचे सल्लागार डॉक्टर विनय कुमारस्वामी यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, सायकलिंगमुळे संधिवात, गुडघेदुखीशी लढण्यास मदत मिळतेच; पण त्यामुळे सांध्यांवरील ताणही कमी होतो. त्यामुळे सांध्यांची झीज कमी होते आणि सतत पेडलिंग केल्यामुळे सायनोव्हियल फ्लुइडचे उत्पादन वाढते, जे निरोगी सांध्यांसाठी महत्वाचे असते.

तुमच्या वजनाचा गुडघ्यांवर होतो परिणाम - तुमचं वजन थोडं जरी वाढलं, तरी त्याचा गुडघ्यांवर खूप ताण येतो. जसं की, तुमचं एक किलो वजन वाढलं, तर गुडघ्यांवर ४ किलोंचा भार येतो. जर तुम्हाला वेदनारहित सांधे हवे असतील, तर व्यवस्थित जेवा आणि वारंवार हालचाल करा. त्याबद्दल दी इंडियन एक्स्प्रेसने दिल्लीतील मॅक्स स्मार्ट सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील ऑर्थोपेडिक्स आणि जॉइंट रिप्लेसमेंटचे संचालक डॉक्टर रमणिक महाजन यांच्याशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, एक किलो वजनामुळे गुडघ्यांवर चार पट जास्त दबाव येऊ शकतो. म्हणून तुमचे गुडघे सक्रिय ठेवण्यासाठी दर तासाला घरात फेरफटका मारा आणि जास्त वेळ एकाच ठिकाणी बसणे टाळा. जर तुमचे गुडघे सुजले असतील, तर आरामासाठी बर्फाचे पॅक किंवा हीट पॅक वापरा.

गुडघ्याला आधार द्या - तुमच्या गुडघ्यांना आधाराची गरज आहे. आठवड्यातून दोन-तीन वेळा स्क्वॅट्स, लेग लिफ्ट्स व कर्ल करा आणि तुमच्या क्वाड्स, हॅमस्ट्रिंग व कॅव्हल्सना प्रशिक्षित करा. चुकीच्या आसनामुळे सांध्यांवर, विशेषतः गुडघ्यांवर ताण येतो; जे शरीरातील सर्वांत मोठा भार सहन करतात. अतिरिक्त दबाव पडल्यामुळे गुडघेदुखी संभवते. त्यामुळे वेळोवेळी तुमच्या वजनावर लक्ष ठेवा आणि तुमच्या दैनंदिन दिनचर्येत वजन कमी करण्याचे व्यायाम समाविष्ट करा, असे डॉक्टर महाजन म्हणाले. योग्य शूज घाला - चुकीचे शूज घातल्यामुळे गुडघ्याला दुखापत होऊ शकते. आर्च सपोर्ट किंवा गादीसारखे नरम असणारे शूज निवडा. हील्स, फ्लॅट्स व स्नीकर्स घालणे टाळा.

# शिक्षण म्हणजे काय रे भाऊ?

देशातील लोकांना अजूनही शिक्षणाचा अर्थ, गांभीर्य आणि उद्देश कळालाच नाही. आजही कोणाला विचारले शिक्षण म्हणजे काय तर तो व्यक्ती बिए,.बिएससी, एम ए,एम एस सी असेच सांगेल. आणि सुशिक्षित म्हणजे कोण तर वरील सांगितल्या प्रमाणे शिक्षण घेणारा व्यक्ती म्हणजे सुशिक्षित असेच उत्तर येणार. हा लेख लिहण्या मागचा उद्देश हा आहे कि एका शिक्षकाने स्वतःच्या मुलीला कमी गुण मिळाले म्हणून मारले आणि त्यात तिचा मृत्यू झाला. सदर घटना ही मनाला चटका देणारी आहेच. घटना घडल्यावर अनेक लोक स्वतः चे मत मांडून घडलेल्या घटनेचा निषेध करून पालकांनी कसे रहावे याचे सल्ले देत आहेत. शिक्षक पित्याने मुलीची हत्या केल्याने जास्तच प्रकरण तापले गेले. शिक्षकाने जे केले ते चुकिचे आहेच परंतु बाकीचे स्वतःला सुशिक्षित समजणारे लोक बरोबर आहेत का हा प्रश्न ऐरणीवर आहे. शिक्षण म्हणजे काय, शिक्षणाचा उद्देश काय हे अजूनही आपल्याला समजले नाही. आपण थोडक्यात बघितले तर देशात पहिली मुलींची शाळा महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीमाई फुले यांनी सुरू करून महिलांच्या जिवनात क्रांती केली मानसिक, बौद्धिक व शारीरिक गुलामगिरी, अंधविश्वास व विषमतेच्या बेड्या तोडून विज्ञानवादाच्या मार्गाने जाऊन स्वतः मध्ये वैचारिक परिवर्तन होण्याच्या उद्देशाने सुरू केलेल्या शिक्षणाला कुटील व बुद्धीहीन लोकांनी विरोध केला. तरीही अंगावर शेणमाती घेऊन शिक्षणाची कास सोडली नाही. म्हणून चोथ्या वर्गातील मुक्ता प्रश्न विचारते आमचा धर्म कोणता? आज महिलांच्या कपाटात साड्या आणि साड्यावर परफ्यूम चा वास येण्यासाठी सावित्रीमाई यांनी शेण, माती आणि खरकटे पाणी अंगवर सहन केले म्हणजे काय असेल शिक्षण? छत्रपती शाहु महाराजांनी स्वतःच्या राज्यात बोर्डींग सुरू करून एक एक आण्यासाठी संघर्ष करावा लागणाऱ्या काळात मुलांना शाळेत पाठवले नाही तर पालकांना एक रूपया दंड आकारणारे शाहु महाराज शिक्षणाला एवढे महत्त्व का देत होते? शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे आणि जो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी का म्हटले असेल? गाडगेबाबा म्हणतात भाकरी हातावर घेऊन खा पण मुलांना शाळेत पाठवा असे समाजाला वारंवार का सांगत असतील? त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून काय साध्य करायचे असेल? सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिक्षणाची द्वार खुले करून आपल्याला शिक्षीत करण्यासाठी फुले शाहु आंबेडकर यांनी आपले आयुष्य खर्ची घातले त्या महामानवाचे फोटो शिक्षीत लोकांच्या घरात आहेत का? जर हे महापुरुषांचे फोटो घरात लाऊ शकत नाहीत तर यांना शिक्षीत कसे म्हणावे? जो अन्याया विरोधात गुरगुरत नाही ते शिक्षण आहे का? आज डोक्यात मेंदू नसलेल्या लोकांनी शिक्षण म्हणजे फक्त नोकरी मिळवून पैसे कमवण्याचे माध्यम समजले आहे. परंतु शिक्षण म्हणजे केवळ आर्थिक विकास मुळीच नाही. शिक्षण म्हणजे बौद्धीक व वैचारिक परिवर्तन म्हणजे शिक्षण. शिक्षण म्हणजे जास्त मार्क्स घेऊन परिक्षा पास होणे मुळीच नाही. शिक्षण म्हणजे फक्त पैसा मिळण्यासाठी नोकरीच्या मागे धावने मुळीच नाही. शिक्षण माणसाला वैचारिक परिपक्व आणि मानसिक समृद्ध करून मानसामध्ये नैतिकता व प्रामाणिकपणा भरते. शिक्षण माणसाला मानसिक गुलामीतुन मुक्त करते, शिक्षण माणसाला समता व सामाजिक न्याय शिकवते, शिक्षण माणसाला सर्वांसोबत माणसा सारखी वागणूक द्यायला शिकवते, शिक्षण माणसाला स्वतः चा सामाजिक विकास व आपल्या सोबत समाजाचा सामाजिक विकास करायला शिकवते. वरिल बाबी ज्यांच्या अंगी आहेत तो सुशिक्षित आणि त्याने जे आत्मसात केले ते शिक्षण होय. आज आपण शाळा महाविद्यालयात जाऊन वाचलेल्या पुस्तकाला शिक्षण समजतो. आणि शाळा महाविद्यालयात जे पुस्तके वाचली जातात ती बहुतांशी फक्त मार्क्स मिळावे यासाठीच असतात. त्याचे गांभीर्य, आशय व कारण लोकांना कळतच नाही. एक दोन उदाहरणाद्वारे समजून घेतले तर लक्षात येईल. पहिले उदाहरण विज्ञानाचे घेऊ कोणत्याही घडणाऱ्या घटनेला काही ना काही आधार नक्कीच असतो. कोणतीही गोष्ट विना आधार घडत नाही. प्रत्येक घडणाऱ्या गोष्टीमागे कारण असते. आपण आग पेटवली तर ऑक्सिजन मिळतो म्हणून आग जळते, जळणासाठी ऑक्सिजन आवश्यक आहे. हे उदाहरण जगात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीला लागु होते, वेगवेगळे सरायने एकत्र आले तर तिसरीच काहीतरी तयार होते. थोडक्यात प्रत्येक गोष्टीच्या निर्मिती मागे कोणाचा ना कोणाचा आधार आहे हे माहित असताना, विज्ञान प्रत्येकाने शिकलेले असतात आजही लोक चमत्कार, पाखंड यावर जर विश्वास ठेवत असतील तर त्याला शिक्षण म्हणायचे का? दुसरे एक उदाहरण घेऊया राज्य घटनेचे. राज्यशास्त्र किंवा स्पर्धा परिक्षेची तयारी करतांना राज्यघटना प्रत्येक जण वाचतो. मार्क्स मिळविण्यासाठी त्याचा वापर करतात. राज्य घटनेने मुलभूत अधिकार बहाल केले, राज्यघटनेने देश चालतो, राज्य घटने मुळे आपण अन्याय अत्याचारा विरोधात आवाज उठवतो, राज्य घटनेने प्रत्येकाला समान हक्क, स्थान व संधी उपलब्ध करून दिली वगैरे वगैरे सगळं काही वाचतो. स्पर्धा परिक्षा पास होऊन समाजाची सेवा करायची अशी बोलणारे लोक घरात राज्य घटना आणि घटनाकारांचा फोटो लावत नसतील तर त्यांना शिक्षीत म्हणायचे का? शिक्षण हे स्वतः सह समाजाचा उद्धार करणारे माध्यम आहे. आपण आज जर बघितले तर शिक्षणातून तलाठी, पोलीस, ग्रामसेवक, तहशिल कार्यालयातील कर्मचारी, व इतरही कार्यालयातील कर्मचारी यांचा विचार केला तर हे महाविद्यालयात पुस्तक वाचुन नोकरीवर लागलेली लोक आहेत. जे नोकरी वर लागली ते स्वतःला जरा जास्तच बुद्धिमान समजतात. अर्थात सगळेच असे असतात असे नाही पण बहुतांश लोक असेच असतात. गरिबीत शिकुन मी नोकरी ला लागलो म्हणणारे लोक मग तो तलाठी असेल तर शेतकऱ्यां कडून कसे आणि कोणकोणत्या कामाचे किती पैसे घेतो हे शेतकऱ्यांना माहिती आहे. माहीतीच नाही तलाठ्या कडून काम करून घ्यायचे म्हणजे पैसे द्यावेच लागतात असा अलिखित पण सर्वमान्य नियमच आहे. ग्रामसेवक असेल तर घरकुल मिळण्यासाठी बेघर गरिब लोकांकडून किती पैसे घेतात आणि ज्यांनी पैसे दिले नाही त्यांचे घरकुल कसे डावलले जाते आणि ज्यांनी पैसे दिले, जो ग्रामसेवक यांच्या जवळचा आहे त्या व्यक्तीला पक्के घर असताना पुन्हा घरकुल मिळते हे सर्वांना माहिती आहे. पोलिस असतील तर दारू, मटका, प्रवासी वाहने, यांच्या कडून स्वतःच्या खिशात दररोज किती पैसे भरत असतील याची गणती आहे का? एखादे भांडण झाले, चोरी झाली किंवा इतर गुन्हेगारी प्रवृतीची तडजोड करायला किती खर्च येतो लोकांना माहिती आहे. तहशिल मध्ये राशन कार्ड असेल, कोतवाल नक्कल असेल, एवढेच काय निराधार, विधवा, विकलांग लोकांच्या योजना असो या ठिकाणी सुद्धा निराधार, विधवा, विकलांग लोकांकडून ही पैशाची मागणी केली जाते थोडक्यात प्रत्येक कार्यालयात गोरगरिबांचे कामे विनापैसे होत नसतील आणि सरकारी पगार घेऊनही गोरगरीब लोकांकडून ज्यांची खायची सोय नाही, राहायची सोय नाही अशा लोकांकडून पैसे घेऊन स्वतः ची घरे भरणाऱ्या बेईमान लोकांना सुशिक्षित म्हणायचे का? सर्वच सरकारी कर्मचारी भ्रष्ट आहेत असे मुळीच नाही पण आजपर्यंत अनेक उदाहरणे समोर आलेले आहेत तलाठी, पोलीस, ग्रामसेवक व इतरही कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडे करोडो रुपये सापडले. जे पकडले गेले ते फक्त उदाहरण आहेत. असे कितीतरी कर्मचारी दररोज बाहेर गोरगरिबांचे खिसे रिकामे करत आहेत त्यांना शिक्षीत म्हणायचे? जर कर्मचारी लोकांकडे करोडो रुपये सापडू शकतात तर अधिकारी वर्गांकडे किती चे गबाड असेल? आणि संबंधित खात्याच्या मंत्र्याकडे किती पैसा प्रामाणिक कमाईमधील असेल याचा विचार न केलेलाच बरा. पण अशा लोकांना शिक्षीत म्हणायचे का? शाळेतील पुस्तके वाचणारे अनेक लोक अनेक चुकिच्या प्रकरणात गुन्हेगारी क्षेत्रात समोर आहेत त्यांना शिक्षीत म्हणायचे का? बलात्कार, अपहरण हे शिकलेल्या लोकांमध्ये जास्त घडून येते त्यांना शिक्षीत म्हणायचे का? शिक्षक, डॉक्टर, पोलीस, शासकीय, खाजगी कार्यालयात महिला सुरक्षित नाही मग त्यांना सुशिक्षित म्हणायचे का? नाही रे भाऊ ते शिक्षण नाही. स्वतःच्या ताटातील खास गरजुंना देणे, गोरगरिबांना मदत करणे, स्त्रियांचा सन्मान करणे, देश व देशाचे प्रतिकांचा सन्मान करणे, मेहनतीने पैसे कमावून गरजुंना मोठ्या मनाने मदत करणे, आणि सर्वात महत्वाचे नोकरी कोणतीही असो, पैसा कोणत्याही मार्गाने कमवावी पण ते करतात इमानदारी व नैतिकता हरवली जाणार नाही म्हणजे शिक्षण रे भाऊ...

********

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# माझा दिलदार मित्र प्राध्यापक भीमराव साळवे – प्राध्यापक वैजनाथ सुरनर



फुले, शाहू, आंबेडकर, अण्णाभाऊंचे विचार जपणारे समाजातील गौर गरीब अशिक्षित अज्ञानी समाजाव जगणं फुलावं बहराव त्यांना ज्ञान विज्ञान शिक्षण सदाचार विवेक सत्याचा मार्ग दाखवावा म्हणून अहोरात्र प्रपन करीत असणारी त्यातीतच एक व्यक्तिमत्ता म्हणजे विद्यार्थी प्रिय, सामाजिक बांधिलकी जपणारे आमचे मित्र प्राध्यापक भीमराव साळवे होय.

चांगले मित्र आणि चांगले पुस्तके ज्यांच्याजवळ असतील त्यांचे जगणे वागणे सुंदर असते या उक्तीप्रमाणे समाजात अशी अनेक व्यक्ती असतात जी व्यक्ती परिस्थिती पुढे हातबल न होता परिस्थितीवर मात करीत आपले जीवन सुखा समाधानाचे व्हावे इतरांना आपला आदर्श वाटावा इतरांनी आपली प्रेरणा घेऊन स्वाभिमानाने जगावं अशा योग्यतेची असतात.

साळवे सरांचा जन्म २० जून १९६७ रोजी ब्राह्मणगाव तालुका उमरखेड जिल्हा यवतमाळ येथे एका गरीब सामान्य शेतकरी कुटुंबात झाता घरात कसलीही शिक्षणाची परंपरा नाही आई–वडील निरक्षर होते. साळवे सरांचे प्राथमिक शिक्षण गावीच झाले. माध्यमिक शिक्षण श्री तेजमल माध्यमिक माध्यमिक विद्यालयातून झाले. महाविद्यालयीन शिक्षणासाठी नांदेडला गेले. यशवंत महाविद्यालयातून बी.एस.सी पदवी घेतली आणि पुढील शिक्षणासाठी ते संभाजीनगर येथे आहे. मुळात साळवे सर हे ध्येयवादी प्रयत्नवादी विज्ञानवादी शोधक वृत्तीचे संघर्ष करणारे आणि वर्तमानाच्या पटलावर मुळातून उठवण्यासाठी अत्यंत चिकाटीने आई–वडिलांचा आदर्श महापुरुषांच्या प्रेरणा मित्रांचे पाठबळ भविष्याचे नियोजन करून ब्राह्मणगाव तालुका उमरखेड च्या इतिहासात लिहिला जाऊ शकती या आत्मविश्वासाने एम.एस. सी बी. एड ची पदवी घेऊन भाई किशनराव देशमुख महाविद्यालप चाकूर येथे दिनांक १२ जून १९९३ रोजी रसायनशास्त्र या विषयाचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले आणि जीवन प्रवास सुरू झाला. सर विदर्भातीत असल्याने त्यांच्या बोलण्यात वऱ्हाडी बोतीचा वापर होत असतो. सर्व व्यवस्थित चालू असताना त्यांच्या जीवनात दोन आघात झाले. वडिलांचे निधन आणि काही दिवसात बहिणीचे निधन झाले. त्यामुळे सरांच्या आईला अर्धांग वापूचा झटका आला त्या कालावधीत आईची संपूर्ण सेवा प्राध्यापक साळवे सरांनी केली. पुढे २००० मध्ये आईचे निधन झाले आणि सर पोरके झाले.

पुढे सरांचा विवाह सौ ज्योतीताईशी झाला आणि त्यांचा सुखी संसार सुरू झाला. ज्योती ताई पण सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या त्यांना जीवनसाथी म्हणून मिळाल्या आणि सर चाकूर मध्ये स्थायिक झाले. मी घरी बुद्रुक येथे प्राध्यापक म्हणून कार्यरत होतो. सामाजिक चळवळीत कार्यकत्यांना चाकूर मध्ये एका कार्यक्रमात १९९६–९७ मध्ये माझी आणि प्राध्यापक साळवे सरांची ओळख झाली. पुढे प्राध्यापक साळवे सरांना मधुकर कांबळे, रंगनाथ वाघमारे भास्कर कांबळे, रामराव शिरसाटे, विठ्ठल गायकवाड, नरसिंग कांबळे, सुधीव महालिंगे, मिलिंद महालिंगे, गायकवाड धोंडीराम, लक्ष्मण तिट्टे, भोरे साहेब, प्राध्यापक किशन गायकवाड अशा चळवळीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या भेटी झाल्या. महापुरुषांच्या जयंतीच्या निमित्ताने चाकूर तालुक्यात प्राध्यापक साळवे सर हे माझ्याबरोबर अनेक ठिकाणी उपस्थित होते. सरांचा स्वभाव अतिशय प्रेमळ, मायाळू आणि नम्र आहे त्यांनी कचौड़ी कुणाशी गर्व केला नाही

प्राध्यापक साळवे सर व सौ. ज्योतीताईनी धम्मकार्यास स्वतःस वाहून घेतले. स्वतः ताई सुशिक्षित असल्याने सरांच्या सोबत त्या अनेक कार्यक्रमांना उपस्थित राहतात. चाकूर तालुक्यात कार्य करीत असताना सरांच्या कार्याचा अवाक पाहून भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखेने त्यांची भारतीय बौद्ध महासभेच्या चाकूर तालुका अध्यक्षपदी नियुक्ती केली. या कालावधीत धम्मकार्य वाढविण्यासाठी उद्बोधन शिबिर कार्यशाळा प्रशिक्षण घेऊन चाकूर तालुक्यात धम्मकार्यांचा प्रचार प्रसार वाढवला यावेळी त्यांनी धनाचा कधीही विचार केला नाही. समाजामध्ये महात्मा फुले, शाहू आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांचे विचार पाहिजेत यासाठी आपली नोकरी करून चाकूर तालुक्यात गाव–गाव जयंतीच्या माध्यमातून प्रबोधन केले प्राध्यापक साळवे सर अनेक वर्षापासून सातत्याने कार्यरत आहेत म्हणून त्यांना एक तत्त्वनिष्ठ चळवळीच्या वाटेवरचे प्रवासी म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

बऱ्याच वेळा समाजात आपण पाहतो की लोक तोंडावर गोड बोलतात आणि पाठीमागे चेष्टा करतात समोर दिसले की कौतुक करतात आणि पाठीमागे टिकेचे असून ओढतात पण प्राध्यापक साळवे सरांचा स्वभाव हा सरळ आहे कुणाविषयी काहीही बोलायचे नाही आणि कुणाता कुणाविषयी काही सांगायचे नाही करायता खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची प्रवृत्ती आहे वैयक्तिक राग लोक कुणाविषयी आतापर्यंत त्यांनी बाळगला नाही. उलट सामाजिक चळवळीवर प्रचंड निष्ठा ठेवून कार्य करणारे ते अजब व्यक्तिमत्व आहेत. आजही समाजाप्रती त्यांचे प्रेम असल्यामुळे ते समाजाशी आदरपूर्वक वागतात.



साळ भिंतीचे हाडामासाचे सामाजिक कार्यकर्ते आहेत ते समाजातील बरीचशी माणसे शिकते सवरले की समाजाला आपल्या गावाला माणसांना विसरतात आपल्या अहंकारात राहतात पण प्राध्यापक साळवे सरांनी अतिशय प्रामाणिकपणे आणि निष्ठेने समाजाची आपल्या माणसांची सेवा आवडीने केली आहे. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो हा त्यांचा उदात्त दृष्टिकोन समोर ठेवून सर आजही सामाजिक बांधिलकी म्हणून समाजाच्या विविध उपक्रमात तन–मन–धनाने पुढाकार घेऊन कार्य करतात. सामाजिक चळवळीत कार्यकत्यांना सूत्रसंचातनापासून ते मार्गदर्शन करण्यापर्यंत विविध भूमिका आणि संकोचपणे पार पडतात. त्यात त्यांना त्यांची धर्मपती सौ. ज्योतीताईंचा पूर्ण पाठिवा आहे.

समाजातील विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके तसेच आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांना मदत करून त्यांची त्यांनी कधीही प्रसिद्धी केली नाही. प्राध्यापक साळवे सर हे साधी राहणीमान असलेले निर्मळ मनाचे आहेत.

त्यांचा एक मुलगा संविधान आप आप टी अभियांत्रिकीता गुहाटीला अंतिम वर्षात शिकत आहे तर मुलगी बेहत विवाहित असून शिक्षित बी.एस.सी ऐची आहे व जावई जीवक लोणे एफ. डी.ए क्लर्क महाराष्ट्र शासन व नातू स्वराज आहे ते आजोबाची भूमिका ही योग्यतेने पार पडतात.

सर आज ३० जून रोजी ३२ वर्ष १९ दिवस प्रदीर्घ अशी सेवा करून भाई किशनराव देशमुख महाविद्यालयातून सेवा निवृत्त होत आहेत. ते आज सेवानिवृत्त होत असतानाही चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचा नाराजीचा भाव नाही उलट आपण दिलेल्या सेवेबद्दत ते खूप आनंदी आहेत. अशा या सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शिक्षकाच्या सेवापुर्तीच्या गौरव दिनानिमित्त त्यांना व सौ. ज्योतीताईंना पुढील आयुष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देतो. त्यांचे पुढील आयुष्य निरोगी सदृढ राहो यापुढेही त्यांच्या हातून बांगले कार्य धठो सर शेवटी एवढेच म्हणे गेलेले दिवस परत येत नाहीत आणि येणारे दिवस कसे असतील हे सांगता येत नाही म्हणून सर आयुष्यातील प्रत्येक क्षण हसत आणि आनंदी जगा आपणास खूप खूप मंगलमय शुभेच्छा

**********

प्राध्यापक वैजनाथ सुरनर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार
महाराष्ट्र शासन

---

# व्हेज फलाफल कधी ट्राय केलं आहे का? हेल्दी आणि टेस्टी या पदार्थाची रेसिपी जाणून घ्या





फालाफेल हा एक मध्यपूर्व आशियाई पारंपरिक पदार्थ असून तो मुख्यतः चणाडाळीसारख्या हरभर्यापासून तयार केला जातो. फालाफल कुरकुरीत, मसालेदार आणि प्रोटीनयुक्त स्नॅक आहे. तो सहसा पिटा ब्रेडमध्ये सॅलड, हुमस किंवा दही सॉससह सर्व्ह केला जातो. भारतात वेज फालाफलला खूप पसंती मिळते आणि तो हेल्दी व स्वादिष्ट पर्याय मानला जातो.

तुम्ही जर पौष्टिक पण तितकाच टेस्टी असा पदार्थ शोधत असाल तर व्हेज फलाफल तुमच्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. अनेक पोषकतत्वांनी भरपूर हा पदार्थ सकाळच्या किंवा संध्याकाळच्या नाश्त्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. याची रेसिपीही फार सोपी असून तुम्ही फार निवडक साहित्यापासून त्याला तयार करू शकता. चला तर मग लगेच जाणून घेऊयात यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य काबुली हरभरा (चणा) – १ कप (रात्रीभर भिजवलेला) कांदा – १ मध्यम, बारीक चिरलेला लसूण पाकळ्या – ४–५ हिरव्या मिरच्या – १–२ कोथिंबीर – ट कप पुदिना – ञ कप जीरे – १ टीस्पून धने पूड – १ टीस्पून लाल तिखट – ट टीस्पून (ऐच्छिक) लिंबाचा रस – १ टेबलस्पून बेसन – १–२ टेबलस्पून (आवश्यकतेनुसार)

मीठ – चवीनुसार तेल – तळण्यासाठी

कृती व्हेज फलाफल तयार करण्यासाठी सर्वप्रथम रात्री काबुली चणा किंवा हरभरा रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा दुसऱ्या दिवशी पाणी न काढता मिक्सरमध्ये बारीक वाटून घ्या. खूप पातळ नको, थोडासा दरदरा वाटावा. या वाटणात चिरलेला कांदा, लसूण, मिरची, कोथिंबीर, पुदिना, जीरे, धनेपूड, लाल तिखट, लिंबाचा रस आणि मीठ घाला.

सगळं मिश्रण एकत्र करा. थोडंसं घट्ट वाटत असेल तर त्यात बेसन घालून नीट मळा.

या मिश्रणाचे छोटे छोटे गोळे किंवा टिक्कीसारखे आकार करून तयार ठेवा.

एका कढईत तेल गरम करून फालाफेल मध्यम आचेवर कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या.

तळून झाल्यावर पेपरवर काढा, जेणेकरून जास्तीचे तेल निघून जाईल. गरमागरम फालाफेल हुमस, पिटा ब्रेड, किंवा दही सॉससह सर्व्ह करा. हवे असल्यास या मिश्रणात किसलेली गाजरं किंवा बीट घालून रंगत वाढवू शकता.

बेक करून किंवा एअर फ्राय करूनही हे फालाफेल अधिक हेल्दी बनवता येतात. ह्या स्वादिष्ट आणि पौष्टिक फालाफलचा आस्वाद घ्या आणि तुमच्या कुटुंबीयांनाही नक्की खाऊ घाला

---

# पित्तदोषाची होईल कायमची दूर! रिकाम्या पोटी नियमित खा 'ही' हिरवी पाने, घरगुती उपाय करून मिळवा आराम

बदललेली जीवनशैली, कामाचा वाढलेला तणाव, अपुरी झोप, मानसिक तणाव, शारीरिक हालचालींचा अभाव इत्यादी गोष्टींमुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. बऱ्याचदा शरीरात दिसून येणाऱ्या लक्षणांकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र असे केल्यामुळे शरीराला हानी पोहचते. सतत जंकफूड, चहा कॉफी, तिखट तेलकट पदार्थांचे अतिसेवन इत्यादींमुळे शरीरात पित्त वाढू लागते. शरीरात वाढलेल्या पित्तामुळे सतत आंबट ढेकर येणे, अपचन किंवा मळमळ, उलट्या होण्याची जास्त शक्यता असते. काहींच्या शरीरात पित्तदोष असल्यामुळे त्यांना कोणत्याही पदार्थ खाल्यानंतर लगेच ॲसिडीटी किंवा अपचनाचा त्रास होऊ लागतो. सतत होणाऱ्या ॲसिडिटी आणि अपचनामुळे पोटात वायू तयार होतो.





शरीरात साचून राहिलेले विषारी घटक आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. या विषारी घटकांमुळे पोट आणि आतड्यांसंबंधित समस्या उद्भवू लागतात. आतड्यांमध्ये साचून राहिलेल्या घाणीमुळे अपचन किंवा ॲसिडिटीची समस्या उद्भवू लागते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला शरीरात वाढलेला पित्तदोष कमी करण्यासाठी रिकाम्या पोटी कोणती पाने चावून खावी, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पानांचे सेवन केल्यामुळे पोटात थंडावा सुद्धा टिकून राहील. तसेच शरीर कायम निरोगी राहील. ॲसिडिटीवर प्रभावी पुदिन्याची पाने: सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी पुदिन्याची ५ किंवा ६ पाने नियमित चावून खाल्यास पोटात वाढलेली ॲसिडिटी कमी होईल आणि शरीर कायमच थंड राहील. पुदिन्याची पाने आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आहे. या पानांचे सेवन सेवन केल्यामुळे पचनक्रिया सुधारते आणि डोके दुखीच्या त्रासापासून सुटका मिळते. पुदिन्यामध्ये विटामिन सी मोठ्या प्रमाणावर आढळून येते. शरीराची कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी पुदिन्याच्या पानांचे सेवन करावे. ही पाने पचनक्रिया कायमच निरोगी ठेवतात. शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर काढून टाकण्यासाठी पुदिन्याची पाने प्रभावी ठरतात. याशिवाय तुम्ही पुदिन्याच्या पानांचा रस सुद्धा पिऊ शकता.

पुदिन्याच्या पानांचे सेवन करताना चणे खाण्याऐवजी तुम्ही भीमसेन कापूरचे सेवन करू शकता. यामुळे तोंडात वाढलेली दुर्गंधी कमी होईल आणि आराम मिळेल. याशिवाय पुदिन्याची पाने खाताना त्यासोबत खडीसाखर खाल्यास पित्ताचा त्रास उद्भवणार नाही. याशिवाय सतत येणारे आंबट ढेकर कमी होतील. ॲसिडिटी, अपचन, गॅस किंवा पोटासंबंधित समस्यांनी त्रस्त असलेल्या लोकांनी पुदिन्याच्या पानांचे सेवन करावे.

ॲसिडिटी म्हणजे काय?

ॲसिडिटी म्हणजे पोटातील ॲसिड अन्ननलिकेत परत येणे, ज्यामुळे छातीत जळजळ आणि अस्वस्थता निर्माण होते. ॲसिडिटीची सामान्य लक्षणे कोणती?

ॲसिडिटीची सामान्य लक्षणे म्हणजे छातीत जळजळ, आंबट किंवा कडवट चवीचे द्रव घशात येणे, अपचन, गिळण्यास त्रास होणे, आणि घसा खवखवणे किंवा कर्कश वाटणे.

ॲसिडिटीवर घरगुती उपाय काय आहेत?

ॲसिडिटीवर अनेक घरगुती उपाय उपलब्ध आहेत, जसे की जेवणानंतर बडीशेप खाणे, आल्याचा चहा पिणे, बेकिंग सोडा आणि कोमट पाण्याचे मिश्रण पिणे, तसेच थंड दूध पिणे.

---

# यंदाच्या विकेंडला साऊथ इंडियन नाश्त्याचा बेत; घरी बनवा सॉफ्ट आणि मसालेदार चवीनेच मन होईल खुश

नाश्त्याचा विचार आला की प्रत्येकाच्या डोळ्यांसमोर साऊथ इंडियन पदार्थ म्हणजेच इडली, डोसा हे पदार्थ येतात. हे असे पदार्थ आहेत जे सर्वांनाच नाश्त्यात खायला फार आवडतात. प्रत्येकाच्या घरी विकेंडला इडली–डोसाचा प्लॅन हा बनतोच. अशातच आज आम्ही तुमच्यासाठी या पदार्थाचीच एक नवीन आणि ट्रेंडिंग डिश घेऊन आलो आहोत, ज्याचे नाव आहे पोडी इडली!

घी पोडी इडली ही एक लोकप्रिय दक्षिण भारतीय डिश आहे, जी विशेषतः तमिळनाडूमध्ये खूप प्रसिद्ध आहे. 'पोडी' म्हणजे एक विशिष्ट प्रकारची कोरडी चटणी ज्यात तूर डाळ, उडद डाळ, लाल मिरच्या आणि इतर मसाले असतात. ही चटणी इडलीवर टाकून तुपात किंवा तेलात परतवली जाते. चवीला हा पदार्थ फार अप्रतिम, झणझणीत आणि मसालेदार लागतो. तीच तीच इडली खाऊन कंटाळा आला असेल तर ही टेस्टी पोडी इडली एकदा नक्की ट्राय करा. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य इडल्या – ८ ते १० (शिजवून थंड केलेल्या, कापून छोटे तुकडे केलेले)

- तूर डाळ – २ टेबलस्पून
- उडद डाळ – २ टेबलस्पून
- सुकी लाल मिरची – ४ ते ५
- हिंग – १ चिमूट
- मीठ – चवीनुसार
- तेल – १ चमचा
- तीळ – १ चमचा (ऐच्छिक)
- तूप किंवा तेल – २ टेबलस्पून
- कढीपत्ता – काही पाने
- मोहरी – १/२ चमचा
- हळद – १/४ चमचा

कृती पोडी इडली तयार करण्यासाठी सर्वप्रथम आपण याचा पोडी मसाला तयार करणार आहोत, हा मसाला तुम्हाला विकतही मिळू शकतो





आता एका पॅनमध्ये थोडं तेल गरम करून तूर डाळ, उडद डाळ, लाल मिरच्या, हिंग आणि तीळ घालून मध्यम आचेवर सोनेरी रंग येईपर्यंत भाजा. थंड झाल्यावर मिक्सरमध्ये चवीनुसार मीठ घालून दरदरीत पूड तयार करा.

एक पॅनमध्ये तूप/तेल गरम करा. त्यात मोहरी टाका. फडफडली की कढीपत्ता आणि हळद घाला.

त्यात आधीपासून तयार इडलीचे तुकडे घाला आणि हलक्या हाताने परता.

आता त्यावर तयार केलेली (किंवा बाजारातून आणलेली) पोडी चटणी आवडीनुसार घालून सर्वकाही नीट एकत्रित मिसळून घ्या.

वरून झाकण ठेवून २–३ मिनिटं मध्यम आचेवर तुपाचा वास येईपर्यंत याला छान परतून घ्या.

तुमची तयार पोडी इडली गरमा गरम खाण्यासाठी सर्व्ह करा

ही इडली तुम्ही नारळाची चटणी किंवा अशीच देखील खाण्यासाठी सर्व्ह करू शकता.

पोडी इडलीसाठी जुना इडलीचा उपयोग केल्यास ती जास्त चांगली लागते कारण ती थोडी कोरडी होते.

पोडी मसाल्याचे प्रमाण आपल्या झणझणीत आवडीनुसार ठरवा.

---

# चॉकलेटपेक्षा लागेल भारी चव! लालचुटुक लिचीपासून घरी बनवा आंबटगोड 'लिची जेली', नोट करून घ्या रेसिपी

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बाजारात लिची, चेरी इत्यादी हंगामी फळे उपलब्ध असतात. लहान मुलांपासून ते अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं लिची खायला खूप जास्त आवडते. चवीला आंबटगोड असलेली लिची पावसाळ्याच्या दिवसांमध्ये बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. फळांचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. लिचीमध्ये असलेला नैसर्गिक गोडवा, अँटीऑक्सिडंट्स, फायबर्स त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. याशिवाय पचनक्रिया निरोगी ठेवतात. लिची खाल्यामुळे इम्युनिटी वाढण्यास मदत होते. लहान मुलांसाठी बऱ्याचदा बाजारातून जेली विकत आणली जाते. विकत मिळणारी जेली बनवताना अनेक हानिकारक पदार्थांचा वापर केला जातो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये आंबटगोड लिचीपासून जेली बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. तुम्ही बनवलेली जेली लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडते. साहित्य: लिची साखर चीन ग्रास पावडर बीटाचा रस पाणी कृती: लिची जेली बनवण्यासाठी सर्वप्रथम, लिची स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर लिचीची साल काढून त्यात बी सुद्धा काढा.





लिचीचा काढून घेतलेला गर मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक पेस्ट तयार करा. पॅन गरम झाल्यानंतर त्यात तयार केलेली लिचीची पेस्ट टाकून मंद आचेवर शिजवा. त्यानंतर त्यात चवीनुसार साखर टाका. साखर व्यवस्थित मिक्स झाल्यानंतर तयार केलेल्या मिश्रणात चीन ग्रास पावडर आणि थोडस पाणी घालून व्यवस्थित मिक्स करून घ्या. जेलीचे मिश्रण चमच्याने सतत मिक्स करत राहा. घट्टसर मिश्रण झाल्यानंतर जेली व्यवस्थित तयार होईल.

तयार केलेले मिश्रण चॉकलेट मोल्डमध्ये भरा. त्यानंतर त्यावर थोडासा बीटचा रस टाकून जेली फ्रिजमध्ये सेट होण्यासाठी ठेवा. ५ ते ५ तासांनंतर जेली तयार होईल. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली लिची जेली.

---

# गुरुवार होईल खास! रात्रीच्या जेवणात घरी सोप्या पद्धतीमध्ये बनवा साबुदाणा केळीची खीर, नोट करा हटके रेसिपी

उपवासाच्या दिवशी प्रत्येक घरात साबुदाणे खाल्ले जातात. साबुदाण्याची खिचडी, साबुदाणा वडा किंवा साबुदाण्यांपासून बनवलेले इतरही पदार्थ नेहमीच खाल्ले जातात. पण आज आम्ही तुम्हाला साबुदाण्यांपासून खीर बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. बऱ्याच घरांमध्ये अजूनही अनेकांना जेवणाच्या ताटात काहींना काही गोड पदार्थ खाण्याची सवय असते. शिरा, खीर, मिठाई किंवा रबडी खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. खीर हा पदार्थ सर्वच घरांमध्ये कायमच बनवला जातो. रव्याची, गव्हाची, शेवयांची इत्यादी अनेक प्रकारची खीर बनवली जाते. मात्र आज आम्ही तुम्हाला साबुदाणे केल्याची खीर बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ १० मिनिटांमध्ये लगेच तयार होतो. चला तर जाणून घेऊया साबुदाणा केळ्याची खीर बनवण्याची रेसिपी.

साहित्य:

- साबुदाणा
- केळी
- साखर
- वेलची पावडर
- बदाम
- तूप
- काजू
- जायफळ पावडर





कृती: साबुदाणा केळीची खीर बनवण्यासाठी सर्वप्रथम, केळीची साल काढून बारीक तुकडे करा. तसेच साबुदाणे स्वच्छ धुवून रात्रभर पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी त्यातील पाणी काढून घ्या.

कढईमध्ये तूप गरम करून बदाम, काजू घालून भाजून घ्या. भाजलेले सर्व ड्राय फ्रुटस प्लेटमध्ये काढून घ्या.

त्यानंतर गरम तुपात साबुदाणे टाकून काहीवेळा मिक्स करा आणि गरम दूध टाकून साबुदाणे शिजण्यासाठी ठेवा.

पॅनमध्ये तेल तूप गरम करून त्यात तुकडे करून घेतलेली केळी भाजून घ्या.

साबुदाणे शिजल्यानंतर त्यात तुमच्या आवडीनुसार साखर टाकून व्यवस्थित मिक्स करा. नंतर त्यात वेलची पावडर आणि जायफळ पावडर घालून सतत ढवळत राहा.

सगळ्यात शेवटी खीरीमध्ये भाजलेले काजू बदाम टाकून मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली साबुदाणा केळीची खीर.

# सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी आंदोलनाचा इशारा देताच परळी-गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम झाले सुरू, रस्ता रोको आंदोलन स्थगित





परळी वैजनाथ :- परळी - गंगाखेड रस्त्याचे रखडलेले काम तातडीने सुरू करावे यासाठी रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी देताच प्रशासन खडबडून जागे झाले आणि रखडलेले काम सुरू केले. मागणीला यश आल्याने सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी दि. ३० जुन रोजीचे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित केले असुन नागरीकांच्या अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न सोडल्याबद्दल प्रशासनाचे आभार व्यक्त केले.

परळी वैजनाथ ते गंगाखेड या राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या काही दिवसांपासून बंद होते. यामुळे नागरिक, वाहनधारक, गावकऱ्यांची गैरसोय होत होती. तसेच रूग्णांची ने-आण करण्यासाठीही वाहन चालकाला तारेवरची कसरत करावी लागत होती. मागील वर्षी पुलाचे काम अर्धवट असल्याने सरस्वती नदीला आलेल्या पुरामुळे २ ते ३ वेळा २ दिवस शहराचा संपर्क तुटला होता. याबाबत वेळोवेळी सांगुनही रस्ता आणि पुलाचे काम केले जात नसल्याने दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी सदरचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे अन्यथा दि. ३० जुन २०२५ रोजी रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, विभाग लातूर, उपविभागीय अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, उपविभाग परळी वैजनाथ यांना दिला होता. याबाबत तहसिलदार व्यंकटेश मुंडे, संबंधित विभागाचे अधिकारी व दाउतपुरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड आणि सहकारी यांच्यात चर्चा झाली. सदरील रस्त्याचे तातडीने सुरू करण्यात आले असून पुलाचे कामही लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासन संबंधितांनी दिले. ईटके कॉर्नर येथीलही कामास प्रत्यक्षात सुरू करण्यात आले आहे.

शक्तीकुंज वसाहत गेटजवळ शाळेसाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने ये - जा करीत असतात येथे गतीरोधक नसल्याने अपघाताची शक्यता असल्याने तिथे गतिरोधक बसण्याची मागणी सरपंच श्रीकांत फड यांनी केली होती. याबाबतही तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. या भागातील जनतेच्या अतिशय जिव्हाळ्याच्या सर्वच प्रश्नावर प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन अर्धवट काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आणि काही कामास प्रत्यक्षात सुरुवात केली. त्यामुळे दाऊदपूरचे सरपंच श्रीकांत (कांताभाऊ) फड यांनी उद्या सोमवार दिनांक ३० जून रोजी करण्यात येणारे रस्ता रोको आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आल्याचे सांगितले. दरम्यान केलेल्या मागण्यांची प्रशासनाने तातडीने दखल घेऊन प्रत्यक्ष कामास सुरुवात केल्याबद्दल श्रीकांत फड यांनी संबंधित विभाग आणि प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

## मोबाईल फोनद्वारे मतदान करता येणारे बिहार बनले पहिले राज्य; घरबसल्या करू शकणार मतदान



बिहार हे देशातील पहिले राज्य बनले आहे, जिथे मोबाईल फोनद्वारे ई-मतदान केले जाईल. ही प्रणाली शनिवार, २८ जून रोजी होणाऱ्या महानगरपालिका सर्वसाधारण आणि पोटनिवडणुक २०२५ मध्ये लागू केली जाईल. त्यामुळे मतदान प्रक्रिया अधिक स्मार्ट, सुरक्षित आणि सुलभ होईल. ५१,१५७ मतदारांचे ई-मतदानाद्वारे मतदान बिहार राज्य निवडणूक आयोगाच्या मते, यावेळी निवडणूक प्रक्रियेत नावीन्य आणून ई-मतदान प्रणाली स्वीकारण्यात आली आहे. या अंतर्गत मतदार मोबाईल ॲपद्वारे घरी बसून मतदान करू शकतील. यावेळी ५१,१५७ नोंदणीकृत मतदार ई-मतदानाद्वारे मतदान करतील. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक, शारीरिकदृष्ट्या अपंग, असाध्य आजारांनी ग्रस्त लोक, गर्भवती महिला आणि स्थलांतरित कामगार यांचा समावेश आहे. या पावलामुळे आरोग्य किंवा इतर कारणांमुळे मतदान केंद्रावर पोहोचू न शकणाऱ्या मतदारांना दिलासा मिळेल. या प्रक्रियेसाठी, पाटणा, पूर्व चंपारण, रोहतास, गया, बक्सर, बांका, सारण आणि सिवान या नगरपालिकांमध्ये सर्वाधिक नोंदणी बक्सर जिल्ह्यातील आहेत. ई-मतदानामुळे निवडणूक प्रक्रिया पारदर्शक होईल आणि मतदानाचा टक्का वाढण्यास मदत होईल. निवडणुकीपूर्वी, मतदारांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे रणनीती आणि तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा केली आहे. ई-मतदान प्रक्रियेअंतर्गत, नोंदणीकृत मतदार मोबाईल ॲपवर लॉग इन करून आणि ओटीपी आणि ओळखपत्राद्वारे पडताळणी करून मतदान करू शकतील. आयोगाने ते पूर्णपणे सुरक्षित आणि विश्वासार्ह असल्याची खात्री केली आहे. ई-वोटिंग प्रणालीची वैशिष्ट्ये ही नवीन ई-वोटिंग प्रणाली ब्लॉकचेन तंत्रज्ञान आणि चेहरा ओळख यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहे, जी मतदान प्रक्रियेला पारदर्शी आणि सुरक्षित बनवते. ही सुविधा प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व्यक्ती, गर्भवती महिला आणि स्थलांतरित मतदार जे मतदान केंद्रापर्यंत पोहोचू शकत नाहीत, यांच्यासाठी आहे. मतदार श-डएउइक्ठ मोबाइल ॲप किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाइटद्वारे मतदान करू शकतात. सुरक्षेसाठी केलेले उपाय एका मोबाइल क्रमांकावरून जास्तीत जास्त दोन नोंदणीकृत मतदार लॉगिन करू शकतात. मतदान करण्यापूर्वी चेहरा स्कॅनिंग आणि मतदार ओळखपत्राशी जुळवणी केली जाईल. संपूर्ण मतदान प्रक्रिया ब्लॉकचेन तंत्रज्ञानाद्वारे सुरक्षित आणि हॅक-प्रूफ बनवली गेली आहे. बिहारमध्ये ई-वोटिंगसाठी नोंदणी कशी करावी? ॲप डाउनलोड करा (सध्या फक्त अँड्रॉइडवर उपलब्ध). ॲप इन्स्टॉल केल्यानंतर आपला मोबाइल क्रमांक टाका आणि तो मतदार यादीशी लिंक करा. मोबाइल क्रमांक सत्यापित झाल्यानंतर तुमची नोंदणी पूर्ण होईल. याशिवाय मतदानाच्या दिवशी तुम्ही ॲप किंवा राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाइटद्वारे मतदान करू शकता.

## ई-चलन प्रणालीत जाचक अटी लादू नये; मंत्री प्रताप सरनाईक यांच्या परिवहन विभागाला सूचना

पुणे - व्यावसायिक वाहतूकदारांच्या वाहनांचा ई-चलनविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी परिवहन विभागाने समिती गठीत करावी आणि एका महिन्यात समितीने अहवाल सादर करावा, असे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. ई-चलन प्रक्रिया सुधारणासंदर्भात आयोजित बैठकीत अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन ) गृह विभाग संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी, विविध वाहतूक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, ई- चलन प्रणालीत सुधारणा करताना प्राधान्याने वाहनचालक व मालक यांना नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहन देणारे निकष असावे, त्यात कुठेही जाचक अटी लादू नये. एकाच दिवसात एका कारणासाठी वेगवेगळी चलन वसूल करू नये. त्यासाठी चलनाचा ग्राह्यता कालावधी निश्चित करावा, व्यावसायिक वाहनांना पार्किंग सुविधा उपलब्ध करून द्यावी. वाहतूक संघटनांच्या समस्या सोडवण्यासाठी परिवहन विभाग, पोलीस आणि संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांची संयुक्त समिती गठीत करावी, त्यामध्ये वाहतूक संघटनांच्या प्रतिनिधींचा सहभाग घ्यावा, जेणेकरून समितीच्या कामात पारदर्शकता व सर्वसमावेशकता येईल. पोलिस विभागमार्फत करण्यात येणाऱ्या कारवाईत सध्याच्या ई-चलन निकषात शिथिलता आणावी. परिवहन विभागाच्या परिपत्रकाच्या निकषानुसार पोलिसांनीदेखील आवश्यक तिथेच कार्यवाही करावी. चलन लावताना लाइव्ह फोटो अपलोड करावे, रिअल टाइम फोटो घ्यावेत. अनावश्यक, नाहक कारवाई करणे थांबवावे, अशा सूचना परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिल्या आहेत.

## विवेक सौताडेकर यांचा मित्र परिवाराकडून सत्कार



लातूर : गेल्या पंचवीस वर्षापासून इतिहास लेखन व संस्कृती संवर्धन यासाठी योगदान देणारे इतिहास अभ्यासक, एक उत्कृष्ट निवेदक व वक्ते तथा शासनाच्या विविध समित्यावर कार्यरत असलेले विवेक सौताडेकर यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास लेखन समितीवर सदस्य तथा नुकत्याच गठीत झालेल्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या लातूर जिल्हा शाखेच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.या निवडीबद्दल शुक्रवार, दिनांक २८ जून रोजी मित्रपरिवाराच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या. विवेक सौताडेकर यांनी 'लातूर: काल आणि आज', 'मातीतील मोती' , 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर : चरित्र आणि विचारधन', 'गोजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज', लातूर जिल्हा,धाराशिव (उस्मानाबाद) जिल्हा , नांदेड जिल्हा, सोलापूर जिल्हा ,पुणे जिल्हा अशी ऐतिहासिक पार्श्वभूमीवर आधारित आज तागायत एकूण १४ पुस्तके प्रकाशित असून तीसहून अधिक शासकीय व अशासकीय ग्रंथ,गौरवग्रंथ,विशेषांकाचे संपादन त्यांनी केले आहे. सौताडेकर हे लातूर जिल्हा शासकीय इतिहास संशोधक मंडळावर इतिहास लेखक म्हणून कार्यरत आहेत. या समितीच्या माध्यमातून त्यांनी वैभवशाली लातूर तसेच मराठवाडा मुक्ती लढ्याच्या इतिहासावर आधारित मुक्ती गाथा या ग्रंथाचे ते संपादक सदस्य म्हणून इतिहास लेखन केले आहे. त्याप्रसंगी माऊली ब्लड बँकेचे संचालक तथा शिवाजी विद्यालयातील सहशिक्षक डॉ. उमाकांत जाधव, राष्ट्रीय आदर्श शिक्षक उमेश खोसे, साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे, दैनिक अदिती एक्सप्रेसचे संपादक गंगाधर डिगोळे, कै. यशवंतराव पाटील विद्यालय, हरंगुळ चे कलाशिक्षक प्रमोद टेकले, नेताजी प्राथमिक विद्यालयातील सहशिक्षक गजानन माने व शत्रुघ्न पंढारे, अक्षर नंदन प्राथमिक विद्यालयाचे सहशिक्षक दत्ता जाधव, साने गुरुजी प्राथमिक विद्यालयातील सहशिक्षक विनोद क्षीरसागर, विष्णुदास आमदापुरे तथा ओम पाटील आदि उपस्थित होते. ींल२याप्रसंगी उपस्थित मित्र परिवाराने विवेक सोताडेकर यांचा फेटा बांधून शाल घालत कुंडीरुपी वृक्ष भेट देत सत्कार करून भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या .

## एमआयडीसीच्या मोकळ्या भूखंडावर विविध प्रकारची झाडे लावून सामाजिक कार्यकर्ते बाबूशेठ कांबळे यांनी केले वृक्षरोपण






नवी मुंबई / के. एच. हनवते :- सामाजिक क्षेत्रामध्ये अग्रेसर असे काम करणारे नवी मुंबईतील व्यवसायिक व सामाजिक कार्यकर्ते बाबुशेठ अर्जुन कांबळे यांनी महापे येथील मोकळ्या भूखंडावर विविध प्रकारची ५० झाडे लावून वृक्षारोपण केले आहे. या वृक्षारोपणामुळे कोणताच भूमाफिया आता या मोकळ्या भूखंडावर अतिक्रमण करणार नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

पावसाळ्याची सुरुवात झाली असता साधारण जून जुलैमध्ये वृक्षरोपण मोहीम मोठ्या प्रमाणात चालू झालेली असते अशातच नवी मुंबई महापे येथील अडवली भूतवली गावा जवळील फ्लॉयकाय हॉटेल शेजारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान या उद्यानाच्या जागेवर बहुजन आंबेडकर चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते बाबू कांबळे यांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण केल्याने वृक्षप्रेमी नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे दरम्यान: यावेळी आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते बुद्धा दिल्पाक हॉटेल व्यवसायिक सुरेश शेट्टी यांच्यासह रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे आठवले गटाचे अक्कलकोट तालुक्याचे अविनाश मडीखांबे यांच्या हस्ते वृक्षारोपण लागवड करण्यात आली. एमआयडीसीच्या मोकळ्या भूखंडावर उैळवी ग्रीन झोन असलेल्या भूखंडावर अतिशय उत्कृष्ट प्रकारची विविध प्रकारची झाडे लावून नागरिकांमध्ये वृक्षरोपण चे महत्व पटवून देण्याचे काम बाबू अर्जुन कांबळे उर्फ (बाबू शेठ ) यांनी केले आहे या पन्नास झाडांचे संगोपन सुद्धा ते करणार आहेत.

## लातूर येथेच स्वतंत्र विभागीय आयुक्तालय करण्यात यावे - माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर

लातूर दि.२८-०६-२०२५ लातूरला विभागीय आयुक्तालय व्हावे यासाठी १९८५ पासून प्रयत्न केले जात आहेत. परंतु तरीही लातूरच्या विभागीय आयुक्तालयाच्या निर्मितीचा प्रश्न तसाच आहे. त्यामुळे लातूर व लातूकरांच्या चौफेर विकासासाठी लातूर, बीड, धाराशिव या तीन जिल्ह्यासाठीचे स्वतंत्र विभागीय आयुक्तालय लातूरला करण्यात यावे. अशी मागणी भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी राज्याचे महामहिम राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांच्याकडे निवेदनाद्वारे केलेली आहे. विभागीय आयुक्तालयाच्या निर्मितीसाठी आवश्यक असणारी तब्बल २२ विभागीय कार्यालये लातूरला सुरू आहेत. त्यामुळे लातूर व शेजारील जिल्ह्याच्या सोयीसाठी लातूर येथेच विभागीय आयुक्तालय करणे गरजेचे आहे. मराठवाड्यामध्ये लातूर, बीड, धाराशिव या तीन जिल्ह्यासाठी स्वतंत्र विभागीय आयुक्तालय करण्यात यावे. अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आलेली आहे. त्यामुळे आपण जनतेच्या भावना लक्षात घेऊन माजी महसूल आयुक्त मा.उमाकांतजी दांगड यांच्या अध्यक्षस्थतेखाली एक समितीही नियुक्त करण्यात आली होती. या समितीने विभागीय आयुक्तालय लातूरलाच व्हावे, या संबंधीचा सकारात्मक अहवालही दिलेला आहे. लातूर जिल्ह्यातील प्रशासकीय बाबीचा विचार करता विभागीय आयुक्तालयासाठी भव्य-दिव्य अशी इमारतही उभारण्यात आलेली होती. त्यातच तीनही जिल्ह्यातील जनतेची कामे होण्यासाठी लातूर हे मध्यवर्ती ठिकाण आहे. व्यापार्यांच्या दृष्टिने लातूर शहरामध्ये होणारी आवक मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे तीनही जिल्ह्याचया दृष्टिने महत्त्वपूर्ण असणार्या लातूर येथील विभागीय आयुक्तालय उभारून या भागातील नागरिकांची सोय करावी अशी मागणीही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी महामहिम राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन् यांच्याकडे केली आहे.

# सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन

मुंबई : प्रतिनिधी-पहिलीपासून हिंदीची सक्ती करण्याच्या निर्णयावरून राजकारण तापलेले असताना सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत असून हिंदी शक्तीबरोबरच शक्तिपीठ महामार्ग, शहरी नक्षलवाद रोखण्यासाठी आणलेले जनसुरक्षा विधेयक आदी विषयांवर सरकारची कोंडी करण्याची मोर्चेबांधणी विरोधकांनी केली आहे. प्रथेप्रमाणे अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्र्यांनी चहापानाचे आयोजन केले असून, प्रथेप्रमाणे विरोधक बहिष्कार घालणार अशी शक्यता आहे.

हिंदी सक्तीच्या विरोधात उद्धव व राज ठाकरे ५ जुलै रोजी एकत्र येऊन मोर्चा काढणार असून राष्ट्रवादी काँग्रेससह अन्य पक्षही सहभागी होणार आहेत. यावरून राज्याचे राजकारण तापलेले असताना, सोमवारी राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू होत आहे. विरोधी पक्षाच्या आमदारांची संख्या कमी असली तरी महायुती सरकारची कोंडी करण्यासाठी विरोधाकांकडे यावेळी अनेक मुद्दे आहेत. पहिलीपासून हिंदीची सक्ती, शेतक-यांचा विरोध डावलून शक्तिपीठ महामार्गाचे काम सुरू करणे, शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारने केलेले घुमजाव, अंदाज समितीच्या धुळे दौ-यात सापडलेले कोट्यवधी रुपयांचे घबाड, पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण असे अनेक मुद्दे विरोधकांच्या हातात आहेत. याचे पडसाद या अधिवेशनात उमटू शकतात.

उद्धव-राज मनोमिलनामुळे ठाकरे गटात उत्साह

५ जुलैच्या मोर्चाच्या निमित्ताने तब्बल १९ वर्षांनंतर उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येत आहेत. मुंबई महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने ही मोठी घडामोड आहे. यामुळे विधानसभेतील पराभवानंतर खचलेल्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे मनोधैर्य वाढले आहे. त्यामुळे अधिवेशनात विरोधक आक्रमक होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आधार घेत महायुती सरकारने राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमांच्या शाळेत इयत्ता पहिलीपासून तृतीय भाषा म्हणून हिंदीचा समावेश केला आहे. याची तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर अनिवार्य हा शब्द वगळून हिंदी ऐच्छिक असेल अशी सारवासारव करण्यात आळ. आता ही केवळ मौखिक भाषा म्हणून शिवली जाणार असे सांगितले जात आहे. पण पहिलीपासून हिंदी नकोच अशी ठाम भूमिका मनसे व उद्धव ठाकरे गटाने घेतली आहे. सरकार मात्र अजूनही त्रिभाषा सूत्र लागू करण्याच्या निर्णयावर ठाम आहे. यामुळे या विधिमंडळात सत्ताधारी आणि विरोधी पक्षात जोरदार खडाजंगी होण्याची शक्यता आहे.

शक्तिपीठही गाजणार

गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीत कोल्हापूर जिल्ह्यातील शेतक-यांचा रोष नको म्हणून वर्ध्यातील पवनार ते सिंधुदुर्गातील पत्रादेवी पर्यंतच्या ८०२ किलोमीटर लांबीच्या शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला स्थगिती देण्यात आली होती. मात्र निवडणुकीनंतर सत्तेत येताच या महामार्गाला पुन्हा चालना दिली आहे. शक्तिपीठ महामार्ग कोल्हापूर जिल्ह्यातून नेण्यास या जिल्ह्यातील मंत्र्यांचाच विरोध आहे. तरीही हा विरोध डावलून महामार्गाचे काम रेटण्याचा सरकारचा निर्धार आहे. त्यामुळे अधिवेशनात या महामार्गाच्या उपयुक्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करून विरोधी पक्षासह सत्ताधारी पक्षाचे आमदार सरकारची कोंडी करू शकतात.

महायुतीने विधानसभा निवडणुकीत शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन दिले होते. राज्यात एप्रिल- मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतक-यांचे मोठे नुकसान केले. गारपीट आणि अवकाळीने शेती पिकाचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शेतक-यांना कर्जमाफी देण्याची मागणी विरोधी पक्षाकडून होत आहे. मात्र, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकरी कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी होईल असे सांगून तूर्त कर्जमाफीचा निर्णय घेण्यास असमर्थता व्यक्त केली आहे. तरीही विरोधी पक्षाकडून अधिवेशनात शेतकरी कर्जमाफीचा मुद्दा लावून धरला जाऊ शकतो.

शिवसेना शिंदे गटाचे आमदार अर्जुन खोतकर अध्यक्ष असलेल्या विधिमंडळाच्या अंदाज समितीचा पहिलाच धुळे दौरा वादग्रस्त ठरला. समितीच्या या दौ-यात शासकीय विश्रामगृहावर कोट्यवधी रुपयांची रोकड आढळून आली. या प्रकरणाची पोलिस चौकशी सुरू असली तरी यानिमित्ताने विधिमंडळ समित्यांच्या कामकाजाकडे संशयाने पाहिले जाऊ लागले आहे. विरोधी पक्ष या प्रकरणावरून सरकारवर तुटून पडण्याच्या तयारीत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE